# पुणे शहरातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वेळ व्यवस्थापनाचा विद्यार्थ्यांच्या असाइनमेंट, शैक्षणिक कार्य व सवयीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**संशोधक : सौ. संगीता पोटे**
मार्गदर्शक, म. म. चे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे

**प्रा. डॉ. बालाजी पोटे**
(एम. लिब.) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## सारांश

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश पुणे शहरातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय वापराच्या सवयी, असाइनमेंटसाठी माहिती शोधण्यास लागणारा वेळ आणि ग्रंथालयातील वेळ व्यवस्थापनाचा अभ्यास करणे हा आहे.

या संशोधनात वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. माहिती संकलनासाठी संशोधिकेने संरचित प्रश्नावलीचा वापर केला तसेच संबंधित ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण केले. संशोधनाची जनसंख्या पुणे शहरातील तीन शारीरिक शिक्षण महाविद्यालयांतील एम.पी.एड. प्रथम व द्वितीय वर्षातील एकूण २४० विद्यार्थ्यांची होती. त्यापैकी प्रश्नावलीस प्रतिसाद देणारे १३० विद्यार्थी नमुना (Sample) म्हणून निवडण्यात आले. संकलित माहितीचे विश्लेषण टक्केवारी या सांख्यिकीय साधनाच्या साहाय्याने करण्यात आले.

अभ्यासातून असे निदर्शनास आले की बहुसंख्य विद्यार्थी ग्रंथालयाला नियमित भेट देतात आणि ग्रंथ घेणे, वृत्तपत्र वाचन, माहिती शोधणे तसेच असाइनमेंटची तयारी या सर्व कारणांसाठी ग्रंथालयाचा उपयोग करतात. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धती उपलब्ध असल्याचे नमूद केले असले तरी ग्रंथ शोधण्यासाठी ते ग्रंथपाल किंवा ग्रंथालय कर्मचाऱ्यांची मदत घेतात. ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य समाधानकारक असल्याचेही विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. बहुतांश विद्यार्थ्यांना आवश्यक ग्रंथ वेळेत उपलब्ध होतात, ग्रंथ मिळविण्यास सुमारे दहा मिनिटांचा कालावधी लागतो आणि असाइनमेंटसाठी आवश्यक माहिती शोधण्यास सरासरी एक तास खर्च होतो. ग्रंथालयातील वेळ व्यवस्थापन आणि संगणकीकृत

कार्यपद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचण्यास मदत होत असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट झाले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यावर होणारा परिणाम हा अतिउच्च असल्याचे जाणवते.

***महत्त्वाच्या संकल्पना:*** ग्रंथालय, सेवा, वेळ व्यवस्थापन, शारीरिक शिक्षण, असाइनमेंट, व विद्यार्थी.

## प्रस्तावना

ग्रंथालय ही कोणत्याही शैक्षणिक संस्थेची ज्ञानसंपदा जपणारी आणि ज्ञानप्रसार करणारी मूलभूत संस्था आहे. विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि समाजातील विविध घटकांना आवश्यक माहिती, संदर्भग्रंथ, नियतकालिके तसेच डिजिटल माहिती संसाधने उपलब्ध करून देण्याचे कार्य ग्रंथालय प्रभावीपणे पार पाडते. उच्च शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसाठी सक्षम आणि अद्ययावत ग्रंथालय व्यवस्था अत्यावश्यक मानली जाते.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानाचा वेगाने विस्तार होत आहे. नवीन संशोधन, ई–जर्नल्स, ई–पुस्तके आणि डिजिटल डेटाबेस यांमुळे माहितीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी उपलब्ध माहितीचा योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने उपयोग करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे ग्रंथालयातील वेळ व्यवस्थापन हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाशी थेट संबंधित झाले आहे.

शारीरिक शिक्षण महाविद्यालयांमध्ये एम.पी.एड. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना विविध असाइनमेंट, प्रकल्प, सेमिनार, संशोधन अहवाल आणि सादरीकरणे तयार करावी लागतात. या सर्व शैक्षणिक कार्यांसाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील मुद्रित तसेच डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करावा लागतो. माहिती शोधणे, संदर्भग्रंथ मिळविणे, आवश्यक साहित्य निवडणे आणि त्याचा अभ्यास करणे यासाठी वेळेचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे ठरते.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी विद्यापीठाचे ''हृदय'' म्हणून ग्रंथालयाचा उल्लेख केला आहे. यावरून उच्च शिक्षणात ग्रंथालयाचे स्थान स्पष्ट होते. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी केवळ समृद्ध ग्रंथसंपदा पुरेशी नसून, त्या ग्रंथसंपदेचा परिणामकारक वापर करण्यासाठी वेळेचे योग्य व्यवस्थापन, प्रशिक्षित ग्रंथालय कर्मचारी, संगणकीकृत सेवा आणि विद्यार्थी–केंद्रित सुविधा आवश्यक असतात.

प्रस्तुत संशोधनात पुणे शहरातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा विद्यार्थ्यांकडून होणारा वापर, असाइनमेंटसाठी माहिती शोधण्यास लागणारा वेळ, ग्रंथालयीन सेवा आणि वेळ व्यवस्थापनाची परिणामकारकता यांचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष ग्रंथालय व्यवस्थापन सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासाविषयीच्या सवयी व शैक्षणिक गुणवत्तावृद्धीसाठी उपयुक्त ठरतील.

संशोधनाची गरज उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना विविध असाइनमेंट, प्रकल्प, संशोधन अहवाल आणि सादरीकरणे पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयाचा नियमित वापर करावा लागतो. ग्रंथालयातील उपलब्ध सेवा, माहिती शोधण्याचा कालावधी, ग्रंथ मिळण्याची गती, कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि वेळेचे व्यवस्थापन या घटकांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर थेट परिणाम होतो. शारीरिक शिक्षण महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय वापराच्या सवयी आणि वेळ व्यवस्थापनाचा अभ्यास तुलनेने कमी प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाद्वारे या बाबींचे विश्लेषण करून ग्रंथालयीन सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी उपयुक्त सूचना उपलब्ध करून देणे आवश्यक वाटले.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. पुणे शहरातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय वापराचा अभ्यास करणे.

२. विद्यार्थ्यांच्या असाइनमेंटसाठी माहिती शोधण्यास लागणाऱ्या वेळेचे विश्लेषण करणे.

३. ग्रंथालयातील मुक्तद्वार पद्धतीचा विद्यार्थ्यांकडून होणारा वापर व सवयी अभ्यासणे.

४. ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या सेवांबाबत विद्यार्थ्यांचे मत जाणून घेणे.

५. ग्रंथालयातील वेळ व्यवस्थापनाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

संशोधन पद्धती (Research Methodology) प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक (Descriptive Research Method) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय वापराच्या सवयी, वेळ व्यवस्थापन आणि असाइनमेंटसाठी माहिती शोधण्याची प्रक्रिया यांचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण (Survey Method) पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

संशोधनाची जनसंख्या (Population) पुणे शहरामध्ये एम. पी. एड्. शारीरिक शिक्षणाची तीन महाविद्यालयांची निवड करण्यात आली. या तीन महाविद्यालयांतील एम.पी.एड. प्रथम व द्वितीय वर्षामध्ये शिकणारे एकूण २४० विद्यार्थी (मुले व मुली) ही संशोधनाची जनसंख्या होती.

न्यदर्श (Sample) संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड (Purposive Sampling Technique) करण्यात आली. एकूण २४० विद्यार्थ्यांना प्रश्नावली देण्यात आली. त्यापैकी १३० विद्यार्थ्यांनी प्रश्नावली पूर्ण भरून परत दिली. त्यामुळे संशोधनाचा अंतिम नमुना १३० विद्यार्थ्यांचा निश्चित करण्यात आला.

**तक्ता क्र. १ :** संशोधनातील जनसंख्या व नमुना

| अ.क. | घटक | संख्या |
|---|---|---|
| १ | शारीरिक शिक्षण महाविद्यालये | ३ |
| २ | एकूण विद्यार्थी | २४० |
| ३ | प्राप्त प्रश्नावली | १३० |
| ४ | अंतिम नमुना | १३० |

माहिती संकलनाची साधने (Tools of Data Collection) प्रस्तुत संशोधनासाठी संरचित प्रश्नावली (Structured Questionnaire) साधनांचा उपयोग करण्यात आला.

माहिती विश्लेषणाची पद्धत प्रश्नावलीतून प्राप्त झालेल्या माहितीचे वर्गीकरण करून त्याचे टक्केवारीच्या साहाय्याने विश्लेषण करण्यात आले.

**तक्ता क्र. २ :** विद्यार्थ्यांच्या प्रश्नावलीचा संख्याशास्त्रीय विश्लेषण

| अ.क्र. | संशोधनाचा घटक | निष्कर्ष (%) | निरीक्षण / अर्थ |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयाला नियमित भेट देणारे विद्यार्थी | ५८.९७ | विद्यार्थ्यांमध्ये नियमित ग्रंथालय वापराची सवय विकसित झालेली आहे. |
| २ | ग्रंथ घेणे, वृत्तपत्र वाचन, माहिती शोधणे व असायमेंटसाठी ग्रंथालय वापरणारे विद्यार्थी | ६९.२३ | ग्रंथालयाचा बहुउद्देशीय शैक्षणिक वापर होत असल्याचे दिसून येते. |
| ३ | मुक्तद्वार (Open Access) पद्धती उपलब्ध असल्याचे सांगणारे विद्यार्थी | ९७.४४ | विद्यार्थ्यांना आवश्यक ग्रंथ स्वतः शोधण्याची सुविधा उपलब्ध आहे. |
| ४ | ग्रंथ शोधण्यासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्यांची मदत घेणारे विद्यार्थी | ५३.९७ | ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे ठरते. |
| ५ | कर्मचाऱ्यांची वागणूक समाधानकारक असल्याचे मत | ७६.९२ | ग्रंथालयातील सेवा व कर्मचारीवर्गाबद्दल विद्यार्थ्यांचे समाधान चांगले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ग्रंथ मिळविण्यासाठी सरासरी १० मिनिटे लागतात | ५३.३३ | ग्रंथ वितरण व वर्गीकरण व्यवस्था तुलनेने कार्यक्षम आहे. |
| ७ | असायमेंटसाठी माहिती शोधण्यास सुमारे १ तास खर्च करणारे विद्यार्थी | ४८.७२ | माहिती शोध प्रक्रियेस पुरेसा वेळ द्यावा लागतो. |
| ८ | आवश्यक ग्रंथ वेळेत उपलब्ध होतात असे सांगणारे विद्यार्थी | ८९.७४ | ग्रंथालयाचा संग्रह व वितरण व्यवस्था समाधानकारक आहे. |
| ९ | ग्रंथालयात सुमारे १ तास अभ्यास करणारे विद्यार्थी | ५६.४१ | विद्यार्थी नियमित अभ्यासासाठी ग्रंथालयाचा प्रभावी वापर करतात. |
| १० | ग्रंथालयाचा तास सक्तीचा असल्याचे मत | ५३.९७ | सक्तीच्या ग्रंथालय तासामुळे विद्यार्थ्यांचा ग्रंथालय वापर व अभ्यासाची सवय लागते. |
| ११ | ग्रंथालयाची वेळ सोयीस्कर असल्याचे मत | बहुसंख्य | ग्रंथालयाचे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांशी सुसंगत आहे. |
| १२ | विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यावर होणारा परिणामाविषयीचे मत | ७०.४४ | ग्रंथालयातील वेळ व्यवस्थापनाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यावर होणारा परिणाम हा अतिउच्च आहे. |

## निष्कर्ष (Findings)

प्रश्नावलीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या विश्लेषणावरून पुढील निष्कर्ष नोंदविण्यात आले.

१. अभ्यासातील ५८.९७% विद्यार्थी नियमितपणे ग्रंथालयाला भेट देतात, यावरून शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालय वापराची सवय चांगल्या प्रमाणात विकसित झालेली दिसून येते.

२. ६९.२३% विद्यार्थी ग्रंथ घेणे, वृत्तपत्र वाचन, माहिती शोधणे व असायमेंटसाठी संदर्भसाहित्य मिळविणे या सर्व कारणांसाठी ग्रंथालयाचा वापर करतात. यावरून ग्रंथालय हे बहुउद्देशीय शैक्षणिक केंद्र म्हणून कार्यरत असल्याचे स्पष्ट होते.

३. ९७.४४% विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात मुक्तद्वार (जशिप अललशीी) पद्धती उपलब्ध असल्याचे नमूद केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक ग्रंथ स्वतः शोधण्याची संधी उपलब्ध आहे.

४. मुक्तद्वार पद्धती उपलब्ध असूनही ५३.९७% विद्यार्थी ग्रंथालय कर्मचाऱ्यांची मदत घेतात. यावरून ग्रंथालय कर्मचाऱ्यांची मार्गदर्शक भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसून येते.

५. ७६.९२% विद्यार्थ्यांनी ग्रंथालय कर्मचाऱ्यांची वागणूक समाधानकारक व सहकार्यपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले. ही बाब ग्रंथालय सेवेच्या गुणवत्तेचे निदर्शक आहे.

६. ५३.३३% विद्यार्थ्यांना ग्रंथ मिळविण्यासाठी सरासरी १० मिनिटे लागतात. यावरून ग्रंथालयातील वर्गीकरण व संगणकीकृत व्यवस्थापन तुलनेने कार्यक्षम असल्याचे दिसते.

७. ४८.७२% विद्यार्थी असायमेंटसाठी आवश्यक माहिती शोधण्यासाठी सुमारे एक तास खर्च करतात. यावरून माहिती शोध प्रक्रियेस पुरेसा वेळ द्यावा लागतो हे स्पष्ट होते.

८. ८९.७४% विद्यार्थ्यांना आवश्यक ग्रंथ वेळेत उपलब्ध होतात, त्यामुळे ग्रंथालयाचा संग्रह व वितरण व्यवस्था समाधानकारक असल्याचे दिसते.

९. ५६.४१% विद्यार्थी ग्रंथालयात दररोज सुमारे एक तास अभ्यास करतात, ही वेळ नियमित शैक्षणिक अभ्यासासाठी उपयुक्त असल्याचे आढळते.

१०. ५३.९७% विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा तास सक्तीचा असल्याचे सांगितले, त्यामुळे विद्यार्थ्यांचा ग्रंथालय वापर व सवय लागण्यास मदत होत असल्याचे दिसते.

११. बहुतांश विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाची वेळ त्यांच्या शैक्षणिक गरजेनुसार योग्य असल्याचे मत व्यक्त केले, त्यामुळे ग्रंथालयाच्या वेळापत्रकाबाबत समाधानाची पातळी चांगली आहे.

१२. ७०.४४% विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा तास सक्तीचा असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यावर होणारा परिणाम हा अतिउच्च असल्याचे जाणवते.

## निष्कर्षांची चर्चा (Discussion)

या संशोधनातून असे स्पष्ट होते की शारीरिक शिक्षण महाविद्यालयांतील विद्यार्थी ग्रंथालयाचा नियमित व प्रभावी वापर करतात. मुक्तद्वार पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना स्वतः माहिती शोधण्याची संधी उपलब्ध झाली असली तरी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनावर अवलंबून असतात. यावरून माहिती शोध कौशल्य (Information Literacy) अधिक विकसित करण्याची आवश्यकता अधोरेखित होते. विद्यार्थ्यांना आवश्यक ग्रंथ वेळेत उपलब्ध होणे, कर्मचाऱ्यांचे सहकार्यपूर्ण वर्तन आणि संगणकीकृत ग्रंथालय व्यवस्था यांमुळे असायमेंट पूर्ण करण्यासाठी आवश्यक वेळेचे व्यवस्थापन अधिक प्रभावी होत असल्याचे दिसून आले.

असाइनमेंटसाठी आवश्यक माहिती शोधण्यास बहुतांश विद्यार्थ्यांना सुमारे एक तास लागतो. आधुनिक डिजिटल साधने, ई–जर्नल्स, ई–बुक्स आणि ऑनलाइन डेटाबेसचा अधिक प्रभावी वापर झाल्यास हा वेळ आणखी कमी होऊ शकतो. ग्रंथालयाचा सक्तीचा तास असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती व नियमित ग्रंथालय वापराची सवय विकसित होत असल्याचेही या संशोधनातून स्पष्ट होते.

# संदर्भ सूची

आगलावे प्रदीप. (२०००), संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे, नागपूर प्रकाशन आगलावे, प. म. (२००५). शालेय शारीरिक शिक्षण, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

आलेगावकर, प. म. (२००५) शालेय शारीरिक शिक्षण, पुणे दिलीपराज प्रकाशन.

बाबट भा. गो. (२०००), शैक्षणिक संशोधन नुतन प्रकाशन, पुणे

भागवत, शशिकला ग. (२००३) ग्रंथालय व्यवस्थापन, युनिव्हर्सल प्रकाशक पुणे.

बुवा जी.ए. (२००७), बांथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह (प्रथम आवृत्ती) दसाई प्रकाशन बांदा सिंधुदुर्ग

http//sanatanprabhatonline.wordpress

शिक्षण संक्रमणः महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, जून २००८,

वाखारकर, दि. गो. (१९९१). शारीरिक शिक्षणाची त्वो व मनोरंजन पुणे पर्वती प्रकाशन, जर्दे, श्रीपाद आ. (१९८८) शारीरिक शिक्षण इतिहास, कोल्हापूरः अंबा प्रकाशन.

कऱ्हाडे बी. एम. (२००९) शास्त्रीय संशोधन पध्दती प्रकाशन, मनोहर पिंपळापुरे : पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स नागपूर

करमकर, प्रकाश गणेश (२०००) ग्रंथालयीन संदर्भ सेवा, पुणेो युनिव्हर्स ल प्रकाशन.

साखरे, राजेंद्र रमाकांत (२००३) ग्रंथालय संदर्भसेवा तात्विक व प्रात्यक्षिक युनिव्हर्सल प्रकाशन.

Singh, Ajmer, (2003) Essential of Physical Education, ludhiyana: Kalyani Publishers,

Judith A. (2002). Time Management, planning, and prioritization for librarian. Lanham, Md: scarecrow press.

Cochran, J. wesley. (1992). Time management handbook for librarian. New York: Greenwood press.

Gothberg, Helen M. & Riggs, Donald E. (1986). Time management study in academic libraries. Final report Washington, D.C.: council on Library Resources.